वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन

संपादक :
शोभा नाईक
रणधीर शिंदे

वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन

संपादक
शोभा नाईक
रणधीर शिंदे

साहित्य अकादेमी

Vangmayetihasache Punarlekhan : Papers presented at a seminar, compiled and edited by Shobha Naik and Randhir Shinde. Sahitya Akademi, New Delhi (2021), Rs.360/-

Copyright © Sahitya Akademi

Shobha Naik & Randhir Shide –: Editors

Genre: Criticism

Published by Sahitya Akademi

First published: 2021

ISBN : 978-93-89467-17-8

Rs 360/-

All rights reserved. No part of this book may be reproduced or utilized in any form or by any means, electronic or mechanical including photocopying, recording or by any information storage and retrival system, without permission in writing from Sahitya Akademi.

SAHITYA AKADEMI
Head Office: Rabindra Bhavan, 35, Ferozeshah Road, New Delhi 110 001
secretary@sahitya-akademi.gov.in, 011-23386626/27/28
Sales Office: 'Swati', Mandir Marg, New Delhi 110 001
sales@sahitya-akademi.gov.in | 011-23745297, 23364204
Kolkata: 4, D.L. Khan Road, Kolkata 700 025
rs.rok@sahitya-akademi.gov.in, 033-2419-1683/ 2419-1706
Chennai: Guna Building Complex (II floor), 443, (304) Anna Salai Teynampet Chennai 600 018
chennaioffice@sahitya-akademi.gov.in, 044-24311741
Mumbai: 172, Mumbai Marathi Grantha Sangrahalaya Marg, Dadar (E), Mumbai 400014
rs.rom@sahitya-akademi.gov.in, 022-224135744/24131948
Bengaluru: Central College Campus, Dr. B.R. Ambedkar Veedhi Bengaluru 560 001
rs.rob@sahitya-akademi.gov.in, 080-22245152, 22130870

Cover design by Sardar Jadhav
Typeset by Sanjay Kanekar and printed by India Printing Works, Mumbai

Website: http://www.sahitya-akademi.gov.in

अनुक्रमणिका

प्रस्तावना : ०१

१. उद्‌घाटनाचे भाषण – भालचंद्र नेमाडे : २१

२. वाङ्मयेतिहास पुनर्लेखन – यशवंत मनोहर : २७

३. वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि स्वरूप – सतीश बडवे : ४५

४. वाङ्मयेतिहासाविषयी थोडेसे – दिगंबर पाध्ये : ५८

भाग २

५. प्राचीन-मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासाचे संशोधन – अविनाश आवलगावकर : ६४

६. मुस्लीम-सुफी वाङ्मयेतिहासाचे संशोधन – शेख इक्बाल मिन्ने : ७२

७. सतराव्या शतकातील ख्रिस्ती मराठी साहित्याचे पुनर्संशोधन व इतिहासपर पुनर्लेखन – सु.म. तडकोडकर : ९२

भाग ३

८. आधुनिक ज्ञानविश्व, वासाहतिक सत्ता आणि भारत – प्राची देशपांडे : ११६

९. प्राच्य-प्रणाली आणि इतिहास – राजा दीक्षित : १४७

१०. वसाहतवादाच्या छायेतलं मराठी साहित्येतिहासलेखन – नीतीन रिंढे : १६२

११. पाश्चात्त्यांच्या अनुषंगाने वाङ्मयेतिहासाचा विचार – संतोष कोटी : १७३

भाग ४

१२. इतिहासलेखनाविषयीचा सबाल्टर्न दृष्टिकोण – चैत्रा रेडकर : १८५

१३. आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचे संशोधन : नव्या दिशा–रमेश वरखेडे :२०६

१४. प्रादेशिक इतिहास – राजा दीक्षित : २३०

१५. स्त्रीवाद आणि वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन – अरुणा देशमुख : २४४

१६. फुले-आंबेडकर विचारधारेतून मराठी वाङ्मयेतिहासचे पुनर्लेखन–शैलेंद्र लेंडे : २५९

भाग ५

१७. गुजराती वाङ्मयेतिहासाचे संशोधन – मृणालिनी कामत : २८८

१८. कन्नड वाङ्मयेतिहासाचे संशोधन – शोभा नाईक : ३०९

१९. वाङ्मयेतिहासाचे संशोधन पाली, संस्कृत, प्राकृत, मागधी, अर्धमागधी या संदर्भातून –भारत सिरसाठ : ३३२

मुक्तचर्चा – भालचंद्र नेमाडे, यशवंत मनोहर, म. सु. पगारे : ३४३

लेखक परिचय : ३६९

18

कन्नड वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन

- शोभा नाईक

कन्नड भाषेला आणि साहित्याला फार दीर्घकालीन परंपरा आहेत. कन्नड साहित्य वैविध्याने युक्त आहे. तत्त्वज्ञानाने ते प्रगल्भ आहे. विविध धर्मग्रंथांनी कन्नड भाषा संस्कृती फुलवली आहे. चालुक्य, होयसळ, गंग, कदंब, विजयनगर आदी राजवटींचे यासंदर्भातील योगदान वैशिष्ट्यपूर्ण आहे. जैन, वैष्णव, भागवत, शैव, वीरशैव, दास या धार्मिक तत्त्वप्रणालींनी कन्नड लोक व साहित्यविश्व संस्कारित केलेले आहे. प्राचीनत्व, 'लोक' या घटकांची शतकानुशतकांपासून चालत येणारी वाटचाल, राजवटींचे अस्तित्व आणि विविध धर्मपंथांचा महत्त्वपूर्ण वावर या घटकांशी निगडित राहून पुढे येणाऱ्या साहित्याच्या इतिहासाचे पुनर्संशोधन करताना अर्थातच या सर्व घटकांच्या अस्तित्वासंदर्भातून चिकित्सकदृष्टी प्रस्तुत ठरेल.

भारतामध्ये आर्य आणि द्रवीड कुळातील विविध भाषा अनेक शतके एकत्र नांदत आल्या. द्रवीड कुळातील कन्नड ही भाषा आर्यकुलीन उत्तर भारतातील भाषांच्या थेट संपर्कातील भाषा. दक्षिणेकडे तिचा संपर्क इतर द्रवीड भाषांशी म्हणजेच आर्य व द्रवीड या दोन्ही कुळांच्या मधल्या पट्ट्यात तिचा संसार मांडलेला. त्यामुळे तिच्या ठायी अनेकविध सत्त्वे एकवटलेली असण्याच्या शक्तता जास्त. त्यांच्याकडे पोहचण्याचा मार्ग मात्र अत्यंत निखळ असायला हवा आहे.

ब्रिटिशांच्या काळात भारतात इतिहासलेखन ही गोष्ट प्रामुख्याने सुरू झाली. तोपर्यंत आपल्याकडे आधुनिक पद्धतीने इतिहासलेखन झालेले नव्हते. परकीय सत्ताधीशांच्या गरजांमधून या देशात इतिहास लिहिण्याची कामे झाली हे लक्षात घेऊन आज एकूणच इतिहासाचे पुनर्शोधन होते आहे. त्याच दृष्टिकोणातून येथे वाङ्मयेतिहासाच्या पुनर्संशोधनाच्या दिशा शोधता येतील.

एकोणिसाव्या शतकात अर्थातच ब्रिटिशांच्या प्रेरणेनेच संशोधकांनी एकेक साहित्यप्रकार घेऊन इतिहास लिहिले. आणि पुन्हा अर्थातच समाजातील वरचा वर्ग तेवढाच शिक्षित असल्याने त्याला मर्यादा ह्या आल्याच. समग्र कन्नड साहित्याचा इतिहास सर्वप्रथम लिहिला तो रं. श्री. मुगळी यांनी १९६३ मध्ये. केंद्रीय साहित्य अकादमीने तो लिहवून घेतला होता. एकमेकांना भारतीय भाषांचे वैभव समजावे हा हेतू त्यामागे होता. त्यामुळे आपली ओळख आपणच दुसऱ्याला करून देण्याची ती कृती होती. आणि या कृतीमध्ये लिहिणाऱ्याच्या दृष्टीला दिसणाऱ्या उत्तम गोष्टीच पृष्ठभागावर येणार हे गृहीतच आहे. पण आजच्या घडीला याप्रकारच्या अनेकविध जागरणांसह वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन आवश्यक ठरते. वास्तविक कन्नड वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन करण्याचे प्रयत्न सातत्याने झालेले आहेत. रं. श्री. मुगळी यांच्या वाङ्मयेतिहासावर तो धर्मपंथकेंद्री आहे असा आरोप ठेऊन काहींनी शतकाशतकांचा असा वाङ्मयेतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला. तर सी. विरण्णा यांनी वाङ्मयेतिहासात राजनिष्ठाच अधोरेखित होते असे मानायचे कारण पडत नाही जेव्हा आपण विचारकेंद्री वाङ्मयेतिहासात लिहू, असे सांगून त्याप्रकारचे लेखन करण्याचा प्रयत्न केला. रं. श्री. मुगळी यांनी लोकसाहित्य विचारात घेतलेले नव्हते. नंतरच्या लेखकांनी लोकसाहित्याचे प्रकरण तसेच कर्नाटकातील वास्तुशिल्पांची ओळख करून देणारे प्रकरण वाङ्मयेतिहासात समाविष्ट केले. जशी ललितलेखकांची जीवनानुभवांना भिडण्याची, ते उकलून घेण्याची दृष्टी नेहमी एकसारखी राहत नाही, सतत नवेनवे दृष्टिकोण येत राहतात तसेच वाङ्मयेतिहासकारांमध्येही भिन्न भिन्न दृष्टी निर्माण होताना दिसते.

आज आपल्याला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे होऊन गेली. पण तरीही

अजून नीट घडी बसलेली दिसत नाही. विघटनवादी प्रवृत्ती जास्तच बोकाळत सुटलेल्या आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोण रुजण्याऐवजी अंधश्रद्धा, समजुतींचे पगडे समाजजीवनातून बाजूला होत नाही आहेत. अशा काळात साहित्यिकावरची जबाबदारी वाढते. त्याच्यावर आपली अस्तित्वे अचूकपणाने शोधण्याची जबाबदारी येते. या जबाबदारीचाच एक भाग म्हणजे वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन होय. ब्रिटिश काळाच्या संदर्भांशी जोडण्यात आलेली नाळ तोडून उभे राहण्याची निकड ओळखणे हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्याकडे अस्वस्थकारक अशा ज्या ज्या समाजप्रवृत्ती निर्माण झाल्या, त्याच्या मागे नेमकी कारणे कोणती आहेत ते शोधून त्यामागे वाङ्मयेतिहासातून होणारी समाजघडण कारणीभूत आहे का हे शोधावे लागेल.

कन्नड वाङ्मयेतिहासात असे नमूद आहे की 'एपिग्राफिक कर्नाटक' या लुईस यांच्या ग्रंथाने कर्नाटकामध्ये आपल्या परंपरांबाबत अभिमान निर्माण केला. कन्नड भाषेचा अभिमानही त्यातून जागला, त्यातूनच आविष्कारांमध्येही कलाटणी निर्माण झाली. तसेच असाही उल्लेख आहे की, उत्तर कर्नाटकाची मूळ कन्नड भाषा असल्याचा शोध ब्रिटिशांमुळेच लागला. तोपर्यंत या भागात फक्त मराठीच शाळा होत्या. कन्नड कुटुंबातील मुलेही मराठी शाळेतच शिकत. हे इंग्रज अधिकाऱ्यांना रास्त वाटले नाही. मग त्यांच्याच पुढाकाराने तिथे कन्नड शाळा आल्या, त्यानंतर त्यांनी नेमलेल्या विद्वानांनी कन्नड पाठ्यपुस्तके लिहिली. आता वास्तविक आपल्याला याच विधानांकडे वेगळ्या दृष्टीने पाहता येईल. इंग्रज हा त्याकाळातील परकीय जेता घटक. जेत्यांनी गुलाम राष्ट्रांत केलेले संशोधन आणि स्थळीय अभिमानाची केलेली जागृती ही तेवढ्या सरळपणाने घेण्याची गोष्ट नाही. कन्नड वाङ्मयेतिहास लेखक भारतातील इतर भाषांपेक्षा इंग्रजी विद्वानांकडे जे आकर्षित होतात त्यातूनच हे स्पष्ट होते. केरी, मॅकरेल, रीव किट्टेल, कॉल्डवेल इ. इंग्रज जी भाषिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वळणे निर्माण करत होते ती आपण वास्तविक भारतीय या जाणिवेतून आज तपासली पाहिजेत. त्यासाठी ब्रिटिशपूर्व देशी जाणिवांपर्यंत अचूकपणे कसे पोहचता येईल ते पाहावे लागेल. त्याचबरोबर नव्याच्या नावाखाली स्वीकारले जाणारे दृष्टिकोणही चिकित्सकतेने तपासणे आवश्यक ठरेल. दृष्टिकोणात बदल झाला पाहिजे या विचारामुळे केवळ केल्या जाणाऱ्या

बदलांमुळे पुनर्वाचनामुळे मूलभूत मूल्यव्यवस्थेचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेण्याचीही आजची वेळ अटीतटीची आहे असे वाटते.

कन्नडमधील 'गोविनहाडु' या नावाने प्रसिद्ध असलेल्या पुण्यकोटी नावाच्या गायीचा वाघाशी होणारा सामना दाखवणाऱ्या लोककथाकाव्याच्या सध्याच्या पुनर्वाचनाची होणारी आठवण येथे नमूद करायला हरकत नाही. ही लोककथा सगळ्याच भारतीय भाषांमध्ये असावी. पुण्यकोटी या गायीची शिकार करायला वाघ येतो. गाय त्याच्या ताब्यात येते. वाघ तिला खाणारच असतो पण गाय विनंती करू लागते की, भुकेल्या वासराला तिला दूध पाजून येऊ दे. वाघ म्हणतो की, तू इथून त्या निमित्ताने निसटशील, परत कशाला येशील? त्यावर गाय, परत येण्याचा शब्द दिल्यावर 'आपण परत येणारच' असे म्हणते. वाघ तिच्यावर विश्वास ठेवतो. तिला घरी जाऊ देतो. भुकेने व्याकुळ झालेल्या वासराला दूध पाजल्यावर गाय त्याचा निरोप घेते. ह्या जगात कसे वागावे ह्याची ती त्याला शिकवणही देते. इतर गायींचाही निरोप घेताना आपल्या वासराकडे त्यांनी लक्ष द्यावे, त्याची काळजी घ्यावी हेही सांगायला पुण्यकोटी विसरत नाही. अशी सगळी नीट आवराआवर करून वाघाकडे परत आलेल्या गायीला पाहून वाघ मात्र थिजून जातो. त्याला पश्चाताप होतो आणि त्यात वाघच आत्महत्या करून मोकळा होतो अशी ती पारंपरिक चालत आलेली कथा. पण आज नव्या पुनर्वाचनात वाघाच्या आत्महत्येला त्याच्या प्रवृत्तीवरचा अन्याय असे म्हणतात! अर्थातच यामधून सत्तांधतेचा पगडा स्पष्ट होतो. समाज आणि संस्कृती यातील सत्ता या घटकांचा अंश आपल्याला अधोरेखित करता येणे आवश्यक ठरेल. या जाणिवेतून कन्नड वाङ्मयेतिहासाच्या पुनर्संशोधनाकडे जाता येईल. साहित्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक सर्जन प्रक्रिया अक्षरबद्ध झालेली असते हे मान्य केल्यावर वाङ्मयामधून भाषा, जात, धर्म, पंथ, स्तर, लिंग या सर्व घटकांचे समाजजीवनातील अस्तित्व उमटलेले असते. त्या संदर्भातून हे पुनर्संशोधन करणे शक्य आहे.

कन्नड साहित्याचा प्रारंभ निर्देशित करताना मुगळी यांनी लोकसाहित्य विचारात घेतलेले नाही. "केवळ ग्रंथस्थ साहित्य विचारात घेतो." (पृ.

२४१) असे म्हटले आहे. त्यातून लिखित वाङ्मयाची परंपरा आणि मौखिक वाङ्मयेतिहासात लोकसाहित्याचेही प्रकरण समाविष्ट करण्यात आलेले आहे. मात्र लिखित आणि मौखिक वाङ्मयामधील अनुबंध ठसठसशीतपणे अधोरेखित केलेला दिसत नाही.

कन्नड आद्य कवीपूर्व कालखंडांचा जो आढावा घेतलेला आहे, त्यातून उपलब्ध लिखित वाङ्मयापूर्वीही साहित्य लेखन परंपरा असल्याचे शिलालेखांवाटे दिसते त्याचे विवेचन आढळते. ग्रांथिक साहित्य दहाव्या शतकापासून आहे. पण पाचव्या शतकापासूनचे कन्नड साहित्य शिलालेखांनी जतन करून ठेवलेले आहे. ज्यावेळेस राजांना एखादी गोष्ट लोकांपर्यंत पोहचवायची असायची त्यावेळी शिलालेख कोरले जात होते आणि अर्थातच त्या शिलालेखांची भाषा लोकछंदांची असे. अभिजनांसाठी काव्यग्रंथ आणि लोकांसाठी शिलालेख अशी त्या काळाची व्यवस्था त्यातून दिसू लागते. शिलालेखांमधून त्रिपदी हा ओवीवजा लोकछंद वापरलेला दिसतो. लोकसाहित्यात त्रिपदी, षट्पदी, सांगत्य, रगळे यासारखे काव्यछंद वापरले जातात. कन्नड लिखित साहित्यातही लोककाव्यछंदांचे उपयोजन सुरू झाले. मौखिक व लिखित पातळ्यांमध्ये झालेली देवघेव नीट उलगडणे महत्त्वाचे सिद्ध होईल. त्यातून ह्या समाजामध्ये रूढ असणाऱ्या मेळाचे स्वरूप स्पष्ट करता येऊ शकेल.

वाङमयेतिहासात नमूद भाषेविषयीचे सर्व तपशील समाजातील बहुभाषिकता, विविध जातीपंथ, धर्मप्रवाह, परकीय आक्रमणांचे अस्तित्व या संदर्भातून समजून घ्यावे लागतील.

कर्नाटक ही प्राचीन काळापासून समन्वयाची भूमी आहे असे नमूद केले जाते. या प्रांतात वैदिक, जैन, बौद्ध, वीरशैव यांचे अस्तित्व होते. धर्म हा घटक आत्मोद्धार आणि समन्वय प्रस्तुत करत होता. मुगळींच्या धर्मकेंद्री वाङ्मयेतिहासानंतर वास्तविक धर्म आणि समन्वय यांची चिकित्सा करत वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन व्हावे. तसा एक लहानसा प्रयत्न करण्यात आला होता. अल्लमप्रभूंच्या निराकारी देव या संकल्पनेची इस्लाममधील अल्लाशी सांगड जोडण्याचा तो प्रयत्न होता. पण त्याला प्रमाण मानले गेले नाही. धर्म

पंथप्रवाहकेंद्री वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन करताना आपल्याला वास्तविक धर्मपंथ आणि त्या त्या वैचारिक तत्त्वप्रणालींच्या बैठकीनुसार साहित्यकृती निर्माण करणारे लेखक परस्परांकडे कसे पाहतात, आपली जीवनदृष्टी प्रस्तुत करताना इतरांच्या जीवनदृष्टीविषयी कोणत्या संवेदना, जाणिवा ते प्रकट करतात ते अधोरेखित करता येईल.

प्राचीन कन्नड साहित्य धर्मप्रवाहांपासून वेगळे काढता येत नाही ही कर्नाटकात वस्तुस्थिती आहे. अगदी आधुनिक कन्नड वाङ्मयातील श्रेष्ठ साहित्यकृतीतूनही पाठीमागे धागे गुंतलेले असतात. नव्या जुन्याचा मेळ आविष्कृत करणाऱ्या कन्नडमधील श्रेष्ठ कृतींचे स्वरूप उलगडतानाही गतकालीन धागे उलगडावे लागतात. त्यामुळे धर्म आणि समन्वय या वास्तवाचे पुनर्संशोधन आवश्यक आहे आणि ते शक्यही आहे. त्यातून समन्वय घटकाचे अपेक्षित स्वरूप आणि प्रत्यक्षातले वास्तव याकडे निर्देश करता येईल.

समन्वयाच्या संदर्भातून पुनर्संशोधन करताना, कन्नड भाषेचा इतिहास, कन्नड राजवटींचा इतिहास आणि त्या राजवटींच्या आश्रयाखाली राहून कन्नड कवींनी प्रस्तुत केलेली साहित्यसेवा प्रामुख्याने विचारात घ्यावी लागेल. राजकीय वाटचालींचा लोकपातळीशी असणारा संबंध आणि त्यातून निर्माण होणाऱ्या लोकसंवेदना नीटपणाने विचारात घेण्याची दिशा दाखविणाऱ्या वाङ्मयेतिहासातील जागा अधोरेखित करणे कन्नडमध्ये बहुचर्चित असलेला बंडाय साहित्याचा प्रवाह यासंदर्भातून विचार केला तर तो का महत्त्वाचा आहे हे जास्त स्पष्ट होईल. समन्वय ही गोंडस बनून गेलेली पदवी डोळसतेने समयोचित न्यायनिष्ठेने समाजजीवनात अस्तित्वात राहणे महत्त्वाचे आहे.

कन्नड भाषा आणि साहित्य यांच्या प्राचीनतेचे दाखले तपशीलवार वाङ्मयेतिहासात नोंदविलेले आहेत. शिलालेख, प्राचीन ग्रंथ, पौराणिक ग्रंथ यांचे अनेक संदर्भ त्यामध्ये आहेत. सभापर्व, भीमपर्व तसेच रामायण यामधील कर्नाटकाचे उल्लेख, ग्रीक प्रवासी टॉलॅमीने कर्नाटकाला दिलेल्या भेटी, अशोकराजाचा कर्नाटकाशी आलेला संबंध दाखविणारे शिलालेख, चंद्रगुप्त, मौर्यकालीन इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील शिलालेख, दुसऱ्या शतकामधील

तमिळ ग्रंथातील करुनार्टर हा शब्द तसेच शूद्रकाच्या मृच्छकटिकमधील काही पात्रांच्या तोंडी असणारी कन्नड भाषा, मार्कंडेय पुराणातील कर्नाट हे नाव इ. दाखल्यावरून प्राचीनतेवर प्रकाश टाकला जातो. पण आपण खूप प्राचीन आहोत इतकेच सिद्ध करण्याबरोबरच आपला इतरांशी जो संबंध आला तो सर्वांगीण पद्धतीने विचारात घेणे महत्त्वाचे आहे.

'कर्नाटक अँड मोहेन्जोदडो' या हेरॉसच्या ग्रंथामध्ये 'कण्णनीर' या चित्रलिपीचा उल्लेख येतो. कण्णव नाडु या धातूंनी मिळून कन्नड हे रूप तयार झाले. कन्नड लिपीमध्ये जी प्राकृतिक चित्रात्मकता आहे ती मूळातील घटक आपल्यात राखून आहे. देवनागरी आणि कन्नड लिपींमध्ये काही देवघेव जरूर झालेली आहे. शिवाय भारतीय तत्त्वज्ञानातील शून्य ही संकल्पना कन्नड लिपीमध्ये जागोजागी अनुस्वाराच्या जागी वापरली जाते. ० शून्य या रूपात त्यांचा अनुस्वार लिहिला जातो. तेव्हा यामध्ये काही महत्त्वाचा परस्परसंबंध असू शकतो याचा शोध घेता येईल. लिपी संदर्भातून शिवाय मूळ द्रवीड कुळातील अतिप्राचीन 'कळवर' (पशुपालन, पशुचोर) या जमातीची भाषा कन्नड होती याचे तपशील वाङ्मयेतिहासात दिले आहेत ते सुरुवातीचे मेळाचे स्वरूप शोधताना उपयुक्त आहेत. त्यामुळे राजवट आणि कन्नड भाषासाहित्य यांची एकत्रित वाटचाल वाङ्मयेतिहासावाटे अधोरेखित होते. आज पुनर्संशोधन करताना सर्वसामान्य माणूस, लोक आणि समाज यांची साहित्याशी निगडित होतानाची अवस्था समजून घेण्याचा अवसर आहे. वाङ्मयेतिहासात नोंद झालेल्या प्रत्येक महत्त्वाच्या साहित्यकृतीचा त्या त्या राजघराण्याशी असणारा संबंधही तिथे आवर्जून अधोरेखित होतो. राजघराण्यांच्या कृपेशिवाय स्वतंत्र प्रज्ञेतून कोणते साहित्य येत होते? हा प्रश्न आज महत्त्वाचा होतो.

कन्नड साहित्याच्या प्रारंभ काळातील जैन कवी संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषांमध्ये पारंगत होते. आपल्या धर्माचे सार लोकांपर्यंत पोहचविणे त्यांना महत्त्वाचे वाटते. वाङ्मय रचायचे तर दैववाणी संस्कृतमध्येच हा वैदिकांप्रमाणे जैन यतींचा आग्रह नव्हता. राजाश्रय मिळाल्यामुळे कन्नडसाहित्यही भरभराटीस आले. 'कविराजमार्ग' हा इ. स. ८५० मधील राजा अमोघवर्ष नृपतुंग यांच्या नावावर असलेला संपादित ग्रंथ कन्नडमधील

आद्यग्रंथ. (मुख्य कर्ता श्रीविजय असल्याचे डॉ.कलबुर्गी यांच्या संशोधनातून पुढे आले) प्राकृत आणि संस्कृतचा आश्रय घेतला तरीही मूळ कन्नड प्रकृतीला जपण्याचे आवाहन या ग्रंथात आहे. कवींचा राजमार्ग घालून देण्याचा हा प्रयत्न म्हणजे वास्तविक समकालीनांचे संपादन करून पुढच्या काळासाठी वाङ्मयेतिहास प्रस्तुत करण्याचा हा एक दाखला ठरतो. मात्र पूर्वीच्या कवींना प्रस्तुत करताना त्यामध्ये त्याही पूर्वीच्या शिलालेखात नोंद असलेल्या 'गजाष्टक' हे 'ओवनिगे ओतकवाडू' (जात्यावरच्या ओव्या) अत्यंत लोकप्रिय होते असे शिलालेखावरून समजते. सातव्या आठव्या शतकामध्ये चालुक्य ह्या कन्नड भाषिक राजाची राजवट सुरू झाल्यानंतर शिलालेखांच्याही भाषेतील काव्यमयता वाढली. यादरम्यानचा 'कप्पेयरभट' येथील शिलालेख नृपतुंगपूर्वकाळातील कन्नड साहित्यावर प्रकाश टाकतो. पाचव्या शतकातील हल्मिडीचा शिलालेख हा पहिला शिलालेख. या सर्व शिलालेखांमधून त्रिपदी या लोकछंदाचा वापर आहे. पण पहिल्या गुणवर्माने 'हरिवंश', 'शूद्रक' हे ग्रंथ रचले. त्यामध्ये गद्यपद्यात्मक प्रौढ चंपूकाव्य हा छंद वापरलेला आहे. आद्यकवी पंपपूर्व काळातील संस्कृत कवीपरंपरेचा प्रभाव या कवींवर होता.

आद्यकवी पंपपूर्व काळात सहाव्या शतकामध्ये दुर्विनित या गंग राजाच्या दरबारात भारवी नावाचा पंडितकवी होता. संस्कृत, प्राकृत, कन्नडमध्ये तो प्रवीण होता. पैशाची या प्राकृत भाषेतील गुणाढ्यलिखित बृहत्कथेचे संस्कृत व कन्नड भाषांतर दुर्विनितच्या नावावर आहे.

आदिकवी पंप यांचा जन्म इ. स. ९०१ मधला. तो चालुक्य अरिकेसरी राजाचा सेनापती होता. त्याने 'आदिपुराण' आणि 'विक्रमार्जुन' या काव्यग्रंथांची निर्मिती केली. 'पंचतंत्र' या संस्कृत ग्रंथाचे कन्नड भाषांतर करणारा दुर्गसिंह हा चालुक्य दुसऱ्या जयसिंहाच्या दरबारात होता.

संस्कृतमधील 'पंचतंत्र' हे विष्णुशर्माचे तर पैशाचीमधील गुणाढ्याच्या बृहत्कथेतील पाच कथांच्या आधारे वासुभागभट्टाने लिहिलेले 'पंचतंत्र' - दुर्गसिंह आपल्यासमोर आदर्श म्हणून ठेवतो. विष्णुशर्माचे वैदिक तत्त्वांधारित पंचतंत्र आणि वासुभागभट्टाचे पंचतंत्र-जैनतत्त्वाधारित आहे, हा फरक नीट समजून घेतला पाहिजे.

अशोक काळापासून राष्ट्रकूट घराणेही प्रसिद्ध होते. नृपतुंगाची कारकिर्द कविराजमार्गने लखलखित केली. त्याचबरोबर त्यांनी कन्नड काव्यपरंपरा, व्याकरणशास्त्र, काव्यशास्त्र, अश्वशास्त्र, वैद्यकशास्त्र, विषवैद्यकशास्त्र, पाकशास्त्र, तर्कशास्त्र इ. शास्त्रग्रंथही निर्माण केले. जैन व हिंदूवैदिकांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. पोन्न कवीला राजाश्रय दिला.

पंप, पोन्न, रन्न, जन्न हे पंपयुगातील श्रेष्ठ कवी कन्नड साहित्याचे वैभव निर्माते ठरले. कन्नडमध्ये जैनकवींची आद्य तीर्थंकारापासून वेगवेगळ्या २४ तीर्थंकारांची चरित्रगाथा काव्यबद्ध करण्याची परंपरा निर्माण झाली. प्रत्येक कवीने एक लौकिक काव्यग्रंथ व दुसरा अलौकिक काव्यग्रंथ लिहिलेला दिसतो.

पंप - आदिपुराण (आद्यतीर्थंकाराची विविध भवावळीची कथा)

विक्रमार्जुन विजय (महाभारतावर आधारित -अर्जुनकेंद्री - अर्जुनाच्या ठिकाणी त्याचा राजा अरिकेसरी)

पोन्न - शांतिपुराण (शांतिनाथ या तीर्थंकाराचे ११ पूर्वजन्म) पुराण चुडामणी

रन्न - अजितनाथपुराण इ.स. ९५० (२४ पैकी दुसऱ्या तीर्थंकारावर)

गदायुद्ध (भीम)

रन्नकंद - कन्नडमधील पहिला शब्दकोश

(कासार जातीतला कवी पण अजितनाथ या जैनमुनींची दीक्षा)

'अत्तिमब्बे चरित्रा'चेही लेखन केले आहे. गंगराजाचा प्रधान चामुंडरायाच्या सान्निध्यात गेल्यानंतर राजवर्तुळ प्राप्त झाले. लोकपातळी आणि राजपातळी यांचा समन्वय शोधताना रन्नचा स्वतंत्र विचार होण्याची आवश्यकता आहे. कन्नड भाषा इतक्या ताकदीने वापरणारा हा पहिला कवी असे म्हणतात.

जन्न - (इ. स. १२३५) राजा वीरबल्लाळच्या आश्रयातील जैन कवी,

अनंतपुराण, यशोधरचरिते

(मुकुंदराज विवेकसिंधूचा लेखनकाळ स्पष्ट करताना विचारात घेतली जाणारी

ओवी 'नृसिंहाचा बल्लाळु । तेयाचा कुमरु जैतपाळु', ग्रंथरचना आणि राजाश्रय यांचा संबंध दाखवते.) ''शके अकरा दाहोतरु।'' शिवकोट्याचार्य - (दहावे शतक) 'वड्डाराधना' नामक धार्मिक कथांचा हा संग्रह सुप्रसिद्ध आहे. ज्ञान, दर्शन, चरित्र व तप या चार आदर्शांची सतत साधना करणाऱ्या जैन यतींच्या ह्या कथा. हाच कन्नडमधील आद्य कथासंग्रह हरिषेण पंडिताच्या संस्कृत कथाकोशानुसार याची रचना झाली. मात्र संस्कृत कथाकोशाचा मूळ आधार प्राकृत ग्रंथ होता! वड्डाराधना गद्यशैलीत आहे. दुदैव कितीही मोठे असले तरी तपोबलाच्या बळावर माणसाला बलवत्तर होता येते, ह्या भारतीय तत्त्वज्ञानाला जैनसरणीतून येथे आविष्कार मिळतो. दहाव्या शतकाअखेरीस पहिला नागवर्मा हा ग्रंथकार, छंदशास्त्रावरचा पहिला ग्रंथ 'छंदोबुधि' व बाणभट्टाच्या कादंबरीचा अनुवाद 'कर्णाट कादंबरी' देतो. गद्यशैलीतील कादंबरी त्याने गद्यपद्यमिश्रित चंपू या छंदात लिहिली. अकराव्या शतकामध्ये नागचंद्राने 'मल्लिनाथपुराण' व 'रामचंद्रचरित्र पुराण' रचले. मल्लिनाथ हा एकोणिसावा तीर्थंकार आहे.

जैन साहित्यात विमलसुरीचा 'पद्मपुराण' हा प्राकृत काव्यग्रंथ अनुसरतात. पंत ते नागचंद्र ह्यांनी रामाकडे वाल्मिकीप्रमाणे पाहिलेले नाही. रामकृष्ण एकपत्नीव्रत आचरणारे नाहीत. रावणही सत्शील, भक्तपरायणच. विमलसुरीच्या संप्रदायातील राम हिंसा करत नाही. एका मोहाप्रसंगी रावण सीतेकडे आकर्षित होतो. तिला पळवतो, तिचा अनुनय करतो. पण तिची न ढळणारी रामनिष्ठा पाहून तोच पश्चातापदग्ध होतो.

बाराव्या शतकात नयसेनचे 'धर्मामृत' हे १४ जैन महाराजांच्या कथा देणारे पहिले लोकाभिमुख जैनपुराण आले. गोष्टीचे कथन करताना उपमा दृष्टांतांचे पहिल्यांदा उपयोजन येथे आले. चक्रधरांचे दृष्टांतांच्या माध्यमातून सूत्रे स्पष्ट करण्याचे शैलीतंत्र याच काळातले. यापूर्वीच्या कन्नड अभिजात साहित्यात उपमा-दृष्टांत देण्याची शैली नव्हती. नयसेनाच्या या शैलीमुळे प्रौढ लेखनशैलीला सर्वप्रथम रोख बसला असे म्हणतात. बाराव्या शतकापर्यंत कन्नडमध्ये संस्कृतचे वर्चस्व टिकले पण पुढे कलाटणी आली.

बाराव्या शतकामध्ये कन्नड राजवटी शिथिल झाल्या. त्यांचा मांडलिक

कलचुरीचा बिज्जळराजा स्वतंत्र झाला. यज्ञयाग बलीप्रथा यांचे प्रस्थ माजलेले. ब्राह्मणांमध्ये जडता, दांभिकता आली होती. देवदेवतांचा सुळसुळाट झाला होता. अशाकाळात 'वचन' हा छंद घेऊन बसवेश्वरांनी प्रवेश केला. वीरशैव सांप्रदायाची स्थापना झाली. त्यांचा मामा बिज्जळाचा सेनापती होता. मुंजी संदर्भातून बसवेश्वरांचे प्रस्थापितांशी वाद झाल्यानंतर बसवेश्वर आणि त्यांच्या बहिणीला मंगळवेढ्याला मामाकडे पाठविण्यात आले. पुढे ह्या बुद्धिमान तरुणाकडे कल्याणच्या बिज्जळाचे मंत्रिपद आले. शिवभक्त बनलेल्या बसवेश्वरांनी राजकीय बळाचा सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी वापर करण्याचे धोरणी पाऊल टाकले. अनुभव मंटप या तात्त्विक चर्चापीठाची निर्मिती त्यांनी केली. कायकच कैलास 'कायकवे कैलास' हे ब्रीद घेऊन सामाजिक उच्चनीचता नष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. समाजात पूर्वापार चालत आलेल्या वचन परंपरेला येथे पुनरुज्जीवन मिळाले. वचन म्हणजे बोलणे. शब्द देणे. शब्दाला बद्ध राहून क्रिया करणे. साहित्याने वचनाच्या रुपात असावे अशी ही भूमिका कन्नड साहित्यात अवतरली. अतिशय सोपे लेखन करून बसवेश्वर व इतर शरणांनी साहित्य आणि सर्वसामान्य समाज यांच्यातील अंतर दूर केले. त्यामुळे वीरशैव साहित्य मराठीमधील वारकरी संप्रदायाप्रमाणे समाजोद्धाराची चळवळ बनले.

अनुभव मंटपाने पूर्वकाळातील वचन साहित्य संकलन-संपादनाचे कार्य केले. आद्यवचनकार जेडर दासीमय्या, कक्कदारचेन्न, शतलेश मादरस (कोळी), अंबिग चौडय्या, मडिवाळ माचय्या (धोबी), चंढय्या (कोष्टी) अशी तळागाळातील विविध जातीतील वचनकार यामध्ये उठून दिसतात.

'दया हाच धर्म' हाच आवाज वचनांमधून प्रकटला. 'ताप चढलेल्या तोंडाला ताजे दूध रुची देईल का?' 'मठातील बोका उंदीर दिसताच टुण्‌दिशी उडी मारतो तसे झाले.' अशा रचना एकंदरीत त्याकाळावर महत्त्वपूर्ण भाष्य करतात. ज्ञानेश्वर, नामदेवांच्या रचनांची, मराठी संतमेळ्याची येथे आठवण होते. वीरशैवांमध्ये आणि चक्रधर व वारकऱ्यांमध्ये पुष्कळ गोष्टी सारख्या दिसतात. तत्कालीन समाजामध्ये कन्नड व मराठी संत मंडळीमध्ये जरूर संवाद असले पाहिजेत.

वीरशैवांचे अध्यक्ष म्हणून कार्य करणारे अल्लमप्रभू 'शब्दसूतक' ही संज्ञा शाब्दिक साहित्यासाठी वापरतात. पल्लेदार भाषा प्रभुत्वाचे प्रदर्शन करणाऱ्या पंपयुगासाठी ही संज्ञा होती की काय हा प्रश्न पडतो! 'आयुष्य महान असते, पण भाषा लहान असते' असेही त्यांचे एक वचन आहे. (आयुष्य हिरीदु भाषे किरीदु) भाषेचा वर्चस्ववाद त्यांना अव्हेरायचा असावा. संबंधांचे सातत्य, प्रवाह, गतिशीलता, जागा, अर्थ या गोष्टी असतील तर भाषेला जिवंतपण. 'देव मेल्याची बातमी आली' हे वचन त्याकाळाला काय सांगू पाहत होते? मुक्तायक्का नावाची वचनकार तर अल्लमप्रभूंना सांगते की 'खरा अनुभव निःशब्दतेत असतो.' आणि ती असेही सांगते की, संबंध हे असंबंध आहेत. या तिच्या सांगण्यातून अल्लमप्रभूंना विलक्षण ज्ञानाचे दर्शन होऊन त्यातून वीरशैव तत्त्वज्ञान साकारत गेले. कायासंबंध, जीवनसंबंध, प्राणसंबंध या विविध संबंधातून मुक्त झाल्यावर गुहेश्वराशी संबंध स्थापन होतो. वीरशैवांमध्ये षट्स्थल सिद्धांत महत्त्वाचा मानतात. चक्रधरांचे 'संबंधीयांचा संबंधु त्याज्य' हे सूत्र याठिकाणी आठवण राहते. मंगळवेढ्याचे कुसू कोसळून त्याखाली चिरडून गेलेला चोखामेळा येथे आठवतो. षट्स्थल सिद्धांतासंदर्भातून नामदेवाचा गुरू विसोबा खेचर यांचीही येथे आठवण होते. (वीरशैव षट्स्थल-भक्तस्थल, माहेश्वरस्थल, प्रासादिस्थल, प्राणलिंक्ष्यीस्थल, शरणस्थल, गुरुकल्याण स्थल) अंतर्बाह्य प्रकाशाचे स्वरूप सांगणारी वचनेही खूप आहेत. आतला प्रकाश कळत नाही त्यास बाहेरचेही काही कळत नाही. मनातली आशा हीच माया असते. जमीन, सोने, स्त्री यांत माया असते असे उगाच म्हणायचे. देहातच देवालय असता आणखी एक देवालय कशाला? 'तू दगड झालास तर मी काय होणार?', 'वेद ही वाचायची गोष्ट । शास्त्र ही बाजारु वार्ता । पुराण गुंडांची कथा । तर्क पाचोळ्याची झुंज । भक्ती दुसऱ्यास दाखवून खायचा लाभ ।', 'लाच खाऊन पाघळणारे देव । आग पाहता अंग चोरून घेणारे देव' अशी वचने पाहिली की चक्रधर, गोविंदप्रभू, नामदेव ते गाडगेमहाराज या संतांची परखड वाणी यापेक्षा काय वेगळी होती असे वाटू लागते.

इ. स. ११५० च्या सुमारास अक्कमहादेवी ही आद्य कन्नड संत कवयित्री होऊन गेली. बाराव्या शतकातील नागचंद्राची समकालीन असणारी कवयित्री कंती नामक स्त्री होऊन गेल्याचे एक अनुमान आहे. पण नागचंद्राने तिचा

कोठेच उल्लेख केलेला नाही. सोळाव्या शतकातील, कंतीविषयक असणाऱ्या दंतकथा खऱ्या मानल्या तर कंती आद्य कवयित्री ठरते.

'पाय नसलेल्या नवरीशी डोकं नसलेल्या नवऱ्याचं लग्न'

'कायेचा संग ठीक कधी असतो सांग? तर सापाचे दात उपटून त्याला खेळवता आल्यावर त्याचा जसा संग! अशा विलक्षण प्रतिमा अक्कमहादेवीच्या वचनांमध्ये आहेत.

डोंगरावर घर केले तर प्राण्यांना घाबरून चालेल?

समुद्रकिनाऱ्यावर घर केले तर लाटांना घाबरून चालेल?

चन्नमल्लिकार्जुना या जगात येणे झाल्यावर स्तुतिनिंदेचा रोष धरून चालेल?'

'पाण्यामुळे मोती झाले, पाण्यामुळे गारा आणि मीठही झाले

मीठ विरघळले, गारा वितळल्या, मोती वितळलेले कोणी पाहिले नाही.'

'दारोदारी हात पसरून भिक्षा मागावी असे कर

मागूनही ती मिळू नये असे कर

आणि मिळालीच तर ती जमिनीवर पडून जावी असे कर

वाकून घ्यायला गेले तर कुत्र्याने झडप घालून ती पळवावी असे कर।'

'भुकेला गावातले भिक्षान्न आहे । तहानेला तळीविहिरी ओढे आहेत

थंडीला फेकलेला धडपा आहे । निजेला ओसाड देवळे आहेत

आणि चन्नमल्लिकार्जुना आत्म संगतीला तू मला आहेस.'

'स्त्रीला स्त्रीत्व असतं, पुरुषाचं सूतक असतं
पुरुषाला पुरुषत्व असतं, स्त्रीचं सूतक असतं
मनाचं सूतक निमालं तर देहसूतकास अवकाश आहे का?'

अशी तिची अनेक वचने कन्नड साहित्य संपन्न करतात. जवळपास २०० वचनकार आहेत. वचने ही तीन ते चार ओळींची असतात. आत्मनुभूतीतून त्यांचा जन्म होतो.

राजकीय सत्ता व सामाजिकता यामधील तत्कालीन द्वंद्व वचन साहित्यातून उमटते. वैराग्य, भक्ती, स्वानुभव, आचारधर्म, तत्त्वविचार, दांभिक समाजावर आक्षेप, शरणांचा गुणगौरव हे विषय त्यात येतात. वचनाच्या शेवटी इष्टदेवतेचे अंकितनाम येते. बारा ते चौदाव्या शतकात वचन साहित्याची भरभराट झाली.

तेराव्या शतकात हरिहर व राघवांक हे कवी पुढे आले. हरिहराने वचन साहित्याकडून प्रेरणा जरुर घेतली पण त्याने त्याच धर्तीवर काव्यग्रंथ रचले. तो शिवभक्त होता. अनेक शिवशरणांच्या चरित्राबरोबरच 'गिरिजाकल्याण' या कथाकाव्याची रचना त्याने केली. तमिळनाडूमधील ६३ शिवभक्त नायन्मारांची चरित्रेही त्याने लिहिली. हरिहराचे साहित्य समन्वयाचा एक दाखला म्हणून विचारात घ्यायला हवे. 'रगळे' नावाचा लोकछंद तो वापरतो. त्यात लयबद्ध मात्रेत यमकाची योजना असते. आदी व अंत्य प्रास साधून द्विपदीच्या रूपात हे चरण प्रस्तुत होते. पहिल्या रगळ्यात पद्य, दुसऱ्यात गद्य आणि तिसऱ्यात गद्य-पद्य मिश्रित असा नवाच चंपूकाव्याचा नमुना गिरिजाकल्याणमधून त्याने सादर केला. शिव-पार्वतीची विवाहकथा यात सांगितली आहे. (कालीदासाच्या कुमारसंभवमध्येही शिवपार्वतीची विवाहकथा येते. पण ती पुढे तारकासुराचा वध करण्याची योजना म्हणून जन्मणाऱ्या कुमारपर्यंत जाते) शिव कामदेवाला भस्म करतो. रती गिरिजेकडे धाव घेते. शिवाच्या भेटीसाठी गिरिजा घोर तपश्चर्या करते. शिव बटूचे रूप घेऊन गिरिजेपुढे साकार होऊन शिवाला शिव्या देऊ लागतो. त्याच्यावर विभुती फेकून बटूला गिरिजा जाळून टाकते. बटूवेश नष्ट होऊन शिवाला तिच्यापुढे प्रकट व्हावे लागते! शिव झाला म्हणून काय? सत्यापुढे असत्य टिकत नाही! अशी विधाने यात येतात.

आपल्या श्रद्धांचीच मजबुती साहित्याकरवी प्रकट कशी होते याचे हे एक उदाहरण. (शिवभक्त असोत, तीर्थंकारांची पुराणे लिहिणारे जैन कवी असोत, विष्णू-कृष्णभक्ती दृढ करू पाहणारे भागवत असोत, प्रत्येकजण याप्रकारे आपापल्या दैवतांना दृढ करण्याचाच प्रयत्न करताना दिसतात.)

हरिहरचा भाचा राघवांक हा रन्नंतरचा महान नाट्यगुण प्राप्त कवी पुढे आला. त्याने 'सोमनाथचरित्र', 'वीरेशचरित्र', 'सिद्धरामपुराण', 'हरिश्चंद्रचरित्र' याचे लेखन केले. सोलापूरकडील सोन्नलक्ष्यी मधील शिवभक्तांचे दर्शन तो घडवतो. शिवभक्तीपर रचना एकीकडे होत असताना त्याच काळात रुद्रभट्ट या ब्राह्मणकवीचे विष्णुपुराणाच्या आधारे जगन्नाथविजय भक्तिमार्गातून ज्ञानप्राप्तीचा संदेश देणारे लेखन साकारले. केशिराजाने शब्दमणिदर्पण हा कन्नड व्याकरणग्रंथ लिहिला. चौंडरसाने दंडीकृत संस्कृत दशकुमार चरित्राचे कन्नड रूपांतर केले. त्यातून विठ्ठलभक्तीचा आविष्कार साधला. त्यापाठोपाठ नरहरीतीर्थ याने भक्तिगीतांची मुहूर्तमेढ रोवली. पुढच्या भागवतांच्या दास संप्रदायाचा हा पाया होता.

याप्रकारे कन्नडमध्ये पंपयुग ते कुमारव्यासयुग असा प्रवास झाला. जैनकवी, वीरशैवकवी आणि भावगतकार ब्राह्मण कवी आपापल्या रचना आविष्कृत करत होते. मुळात कर्नाटकात शैव आणि वैष्णव हा संघर्ष होता. त्यानंतर वैदिक आणि जैन हा संघर्ष. पण नंतर कुमारव्यासांपासून कृष्णाची सगुण भक्ती प्रभावी बनली.

दरम्यान संस्कृत भाषेचा पगडा दूर करण्यास आंडय्याने लिहिलेल्या 'कब्बिगर काव'ने मोठे योगदान दिले. (इ.स. १२२५) लोकजीवनातील प्रेरक शक्ती म्हणून कामदेवाची प्रतिमा, शिवालाही त्याने जिंकून घेणे, शिवाचा शाप भोगणे, पण कामदेवाने शिवास अर्धनारी करणे, कामदेवाने मुनीपुढे हार मानणे इ. कथाबीजे यात येतात.

जैन पंथाला शैव आणि वैष्णवांना कसा झगडा द्यावा लागत होता त्याचे हे उदाहरण लक्षात घेता येईल.

पुढे १६, १७ व्या शतकामध्ये रत्नाकरवर्णी नावाचा एक महत्त्वाचा जैन

कवी येतो. त्याच्या 'भरतेशवैभव' या काव्यग्रंथातून पहिल्या तीर्थंकर पुरुदेव याच्या भरत व बाहुबली या दोन वीरश्रेष्ठ मुलांच्या कथा साकारतात. त्यामध्ये भरतेशाचा (चक्ररत्न) ९९ हजार राण्या असल्याचा उल्लेख येतो. त्यांचे तपशील चित्रित होतात. त्यावरून याकाळात जैनपंथाला वैष्णवांशी सामना करावा लागत होता हे लक्षात येते. याचाच अर्थ त्या काळात कृष्णभक्त भागवत अधिक प्रभावी झाले होते.

कुमारव्यास (१५ वे शतक) हा गदग येथील (कोळवाड) कृष्णभक्त कवी. मध्वाचार्यांच्या 'भारत तात्पर्यनिर्णय'च्या प्रभावातून 'कुमारभारता'ची रचना केली. मूळ व्यासाच्या महाभारतात भावंडांमधील कलह हेच शोकांतिकेचे मुख्य कारण. तिथे कृष्ण केंद्रवर्ती नाही. पण मराठीत चक्रधरांनी, ज्ञानेश्वरांनी कृष्णकेंद्रित्वाची दृष्टी प्रस्तुत केली. कन्नडमध्ये अखंडपणे महाभारत पहिल्यांदा आणणाऱ्या कुमारव्यासांनी हे संपूर्ण महाभारत कृष्णमय केले.

यांच्यानंतर व्यासराय, पुरंदरदास, कनकदास हे दासकवी पुढे आले. मराठीप्रमाणेच गेय अशा कृष्णभक्तीपर स्फुट रचनांचा कन्नडमध्ये संचार झाला.

साहित्य हे समाजातील संघर्षाचा आरसा असल्याचे ह्या सर्व वाटचालीतून प्रत्ययास येते. जैन व बौद्ध तत्त्वज्ञान भारतात दृढ बनलेल्या वैदिकपरंपरेशी सतत सामना करताना जसे साहित्यातून पाहायला मिळते त्याचप्रमाणे वैदिक परंपरेतील शैव-वैष्णव यांतील झगडेही साहित्यात सामावले आहेत. कर्नाटकात जैनपंथीय तत्त्वज्ञानाचे आविष्कार शक्य झाले मात्र बुद्धाचे तत्त्वज्ञान मध्ययुगीन साहित्यात कुठेही प्रकटलेले दिसत नाही. याचे कारण काय असावे त्याचाही शोध घेणे महत्त्वाचे ठरेल.

तर कुमारव्यासांकडून जोरदारपणे भागवतांची परंपरा पुनरुज्जीवित झाली. त्यानंतर पुरंदरदास यांची (इ.स.१४९५-१५६५) कृष्णभक्तीची पदे अत्यंत लोकप्रिय झाली. दासांनी अद्वैत नाकारून द्वैतवाद प्रसृत केला. (४० ते ५० ओळी) सुळादि उगाभोग हे लोकछंद त्यांनी वापरले. ज्ञानी माणसाला कूळ असत नाही असे पुरंदरदासांनी म्हटले. अवीट संगीतमधुर अशी त्यांनी गीते कृष्णभक्ती, नाममहिमा, समाजप्रवृत्तीवर टीका व प्रबोधनपर स्वरूपाची आहेत. विठ्ठलाच्या राणीवरचे 'भाग्यदलक्ष्मीबारम्मा' हे पद कन्नड व मराठी दोन्ही

भाषिकांना तेवढेच प्रिय झाले आहे.

कनकदास (इ.स.१५०८ ते १६०६) : सर्व दास हरिहर विसंबतात तर कनकदास 'तुझ्यावर विसंबून कोण जगले आहे श्रीहरी?' असा प्रश्न उपस्थित करतात. सांगत्य भामिनी षट्पदी या छंदांचा त्यांनी वापर केलेला आहे. स्वतंत्र स्फुटपदेही लिहिली आहेत. शैव, वैष्णव व माध्व या सर्व पंथांतील तत्त्वांचा समन्वय कनकदासांमध्ये दिसतो. त्यांच्या 'मोहन तरंगिणी' या काव्यग्रंथात हरिहर ऐक्यतेचा संदेश आहे. पुराणकथेला समकालीन संदर्भ देण्याचा प्रयत्न येथे आहे. विजयनगरचे समाजजीवन येथे उमटते. नळचरित्रांतून भक्तीचे महत्त्व अधोरेखित होते. हरिभक्तसारमध्येही ११० पदांमधून हरिभक्ती आर्ततेने प्रकटते. अनेक स्वतंत्र स्फुट पदांमधून आत्मोद्धार, विचार स्वातंत्र्य, दांभिकपणावर कोरडे हे विषय सडेतोडपणे आविष्कृत होतात.

कनकदासांचा पंढरपूरशी निकटचा संबंध होता. त्यांच्या नावाचा कट्टा पंढरपूरमध्ये होता. मठही आहे असे म्हणतात. पण यासंदर्भात कन्नड वाङ्मयेतिहासकार काही सांगत नाहीत.

यानंतरचा काळ हा दासकूटकाळ होय. भागवतांचा प्रवाह प्रभावी बनला. रामायण, महाभारत आणि भागवत या कथांवरचे ग्रंथ षट्पदी, सांगत्य या छंदांत रचले जाऊ लगले. जैन व शैव कवींवरही वैष्णवांच्या सगुण भक्तीचा प्रभाव पडला. षट्पदी हा या युगाचा छंद झाला. पद्याकडून गद्याकडे वाटचालही याच काळात झाली. १६ व्या शतकात दक्षिण कर्नाटकात विजयनगर साम्राज्य होते. पण उत्तर कर्नाटकात कन्नड सत्ता नामशेष झाली. १७०० च्या सुमारास षडाक्षरी नावाचा शिवभक्त कवी उदयास आला. त्याने चंपू छंदात 'राजशेखरविलास' या ग्रंथाची रचना केली. लहान मूल मंत्र्यांच्या घोड्याखाली येण्याचा, आईने विलाप करण्याचा प्रसंग येथे चित्रित होतो.

याच काळात 'संची होन्नम्मा' या कवयित्रीने 'हदिबदेय धर्म' (पतिव्रतेचा धर्म) रचले. त्यात पत्नीधर्माबरोबरच पतीधर्मही तिने सांगितला आहे. रामायण, महाभारत, मनुस्मृती, श्रीवैष्णवतत्त्वे यानुसार ती रचना करते. पण तरीही मुलगा-मुलक्ष्यी भेद करण्यावर ती कडाडून टीकाही करते.

हळवनकट्टे गिरियम्मा ही एक कवयित्री या काळात भेटते. ती कृष्णवेडी स्त्री विरक्त, उत्कट भावभक्ती दाटलेल्या रचना करते.

अठराव्या शतकामध्ये सर्वज्ञ नावाचा त्रिपदीकार वचनकार उदय पावतो. त्याच्या रचना अत्यंत सरस उतरल्या आहेत. 'निष्कांचन जरी सत्य वदला तरी शहाणे बरळती । श्रीमंत असत्य वदतो तरी गोड ते सर्वांप्रती ।' या लोकप्रवृत्तीवरती तो बोट ठेवतो. लक्ष्मीश नावाच्या भागवत कवीने 'सीतापरित्याग' हे कथनकाव्य रचले. परिटाचे सीतेविषयीचे उद्‌गार रामापर्यंत पोहचल्यावर राम तिला वनात सोडून देतो. त्यावेळी सीतेच्या तोंडचे उद्‌गार, 'राम दयाळूच पण मीच दोषी, मीच स्त्री म्हणून जन्मले, स्त्री म्हणून पोट भरून घेते हाच माझा दोष ।' पुढच्या स्त्री जागरणाला कारणीभूत ठरले असावेत. चंद्रहासाची स्वतंत्र कथा तो लिहितो. चंद्रहास या बालकावर दुष्टबुद्धी नावाचा मंत्री मारेकरी घालतो. मारेकरी ते बालक जंगलात सोडून येतात. जंगल त्याचा किती मायेने प्रतिपाळ करते ते पाहण्यासारखे आहे. गावातल्या असूयेच्या भावनेहून जंगल कितीतरी चांगले असे संवेदन येथे प्रकटते.

एकोणिसाव्या शतकात संस्कृत व इंग्रजी नाटकांचे कन्नड अनुवाद केले गेले. बसवप्पशास्त्र्यांनी शाकुंतल, चंडकौक्षिक, उत्तररामचरित, ऑथेल्लो हे अनुवाद केले. त्यातून नवतेचा प्रवेश झाला. त्यानंतर मुद्दण्णा या कवीने आपली पत्नी मनोरमा हिच्या मागणीनुसार मुद्दण्णा-मनोरमा संवाद रूपात सरस काव्यरचना देण्याचे कार्य केले. राम-सीता या पौराणिक दाम्पत्य प्रतिमांना मनोरमा-मुद्दण्णा या वास्तव प्रतिमांनी हादरे देण्याचे दिवस कन्नड साहित्यात सुरू झाले. मनोरमेच्या आग्रहातून गद्यकथनाला येथून प्रारंभ झाला. ('ज्या गळ्यात पाणी उतरत नाही त्या गळ्यात कडबू करंजी कोंबू नका।' असे ती म्हणते.)

१८२० ते १९२० हे शतक कन्नड साहित्यात नवतेच्या पहिल्या टप्प्याचे समजतात. रेव्हरंड विल्यम केरीने बायबलचे कन्नडमध्ये केलेले भाषांतर हाच आद्यग्रंथ गद्यग्रंथ ठरतो. १७९४ ते १८६८ च्या दरम्यानच्या म्हैसूरचा राजा मुम्मडी कृष्णराजने ५० हून अधिक ग्रंथांची निर्मिती केली. दरबारातील कवींनी ते त्याच्या नावावर लिहिले असावेत असे मुगळींनी पृ. १८९ वर नमूद केलेले

आहे. यावरून आपल्याला असे अनुमान काढता येते की, राजदरबारात कवींची नियुक्ती करून त्यांनी लिहिलेले ग्रंथ राजाच्या नावावर देण्याचा पूर्वीपासूनचा कन्नडमध्ये प्रघात पाळला गेला असावा. मराठी साहित्यात कवी नरेंद्र यांनी 'ना राजेहो । येणे माझिया कविकुळा बोलु लागैल।' असा बाणेदारपणा दाखवला होता. पंपप्रभावातून मुक्त होऊ पाहणारी ही साहित्यधारा एका अर्थी राजकुळांकडून मुक्त होऊ पाहत होती. लोकांच्या संवेदनांशी संबंधित झालेला आवाज वचनकार बोलू लागले होते. पण इंग्रजांच्या प्रभावातून पुन्हा हा तळागाळातला आवाज बंद झाला. स्वातंत्र्योत्तर काळात सामर्थ्यांने पुढे निधडेपणाने धडधडीत भूमिका घेऊन प्रस्थापित अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य म्हणूनच पुढच्या कन्नड दलित लेखकांनी मराठी दलित साहित्याकडूनच घेतलेले आहे.

आज कन्नडमध्ये बंडाय लेखकांचा प्रवाह अग्रेसर दिसतो. त्याची मुळे कन्नड दलित साहित्य आणि प्रगतीपर साहित्य यात आढळतात. सिद्धलिंगय्या, जंबण्णा अमर, देवनूर महादेव, अरविंद मालगत्ती, चिन्नस्वामी बुड्डाकूळ असे ताकदीचे दलित लेखक आज पुढे आले आहेत. सुरूवातीचा तीव्र आक्रोश शमल्यानंतर आता बंडाय साहित्यधारा पुन्हा पुनरुज्जीवित केली गेली आहे. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी स्थापलेल्या संप्रदायाला या प्रवाहाने स्वतःला जोडून घेतलेले आहे. दलित साहित्याच्या प्रवाहात प्रगतीपर परिवर्तनाची भूमिका घेणारेही लेखक सहभागी होत आहेत. बंडाय साहित्य परिषद आकारण्यात आली आहे. त्यामध्ये कोणीही अध्यक्ष असत नाही. तिघांचे संचालक मंडळ असते. त्यात दोन लेखक दलित आणि एक प्रगतीपर लेखक अशी योजना असते. जाचक तत्त्वांमध्ये बदल करणे हा या लेखनामागचा मुख्य उद्देश असतो.

इंग्रजांनी विद्यापीठांतून प्रस्तुत केलेल्या (मेकॉले) मिल्टन, शेक्सपिअर, वर्डस्वर्थ, कीट्स- मिल, मोर्ले (विचारवंत), स्कॉट, डिकन्स (कादंबरीकार) यांच्या साहित्याने तरुणवर्ग प्रेरित झाला होता. पण त्यातूनच गुलामगिरीची जाणीव होऊन वेदोपनिषदांच्या व्यासंगातून निराळी गहन दृष्टीही निर्माण झाली. नास्तिक व आस्तिक प्रवृत्ती वेगवेगळ्या आयामांनी साहित्यसृष्टी रचू लागल्या.

१९२० ते १९४७ या स्वातंत्र्यसंग्रामाच्या कालखंडात स्वतंत्र साहित्यसृष्टीलाही बहर आला. नवकाव्य प्रभावातून कुवेंपु (के. व्ही. पुटप्पा) अवतरले. त्यांच्यासह पु. नरसिंहाचार्य इत्यादींनी भावकवितेचा नवा नजराणा निर्माण केला.

याच दरम्यान लोकसाहित्याकडे लक्ष केंद्रित झाले. मधुरचेन्न व सिंपी लिंगप्पा हे आद्य संकलक पुढे आले. लोकछंदात काव्य रचणारे द. रा. बेंद्रे आले. प्राचीन कवितेने अनुभव व धर्म या विषयांकडे लक्ष दिले होते. तर नवे साहित्य संपूर्णपणे स्वतंत्र झाले पण जुन्यालाच नवतेचा स्पर्श देऊ लागले.

मास्ति वेंकटेश अय्यंगार (१९२०) यांनी लघुकथेचा पैस विस्तारित केला. त्यांना आधुनिक लघुकथेचे जनक म्हणतात. शिवराम कारंथ यांनी सामाजिक अशा गहन प्रश्नांना हात घातला. मरळि मण्णिगे, मूकज्जीय कनसुगळु, बेट्टद जीव इ. मूलभूत जीवन विचार देणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या. कुवेंपु यांची मलनाड प्रदेशातील जीवनाला कवेत घेणारी 'कौनूर सुब्बम्म हेग्गडति' ही महाकादंबरी आली. वि.कृ.गोकाक यांनी 'समरसवे जीवन' या त्याच मार्गाच्या कादंबऱ्या दिल्या. ऐतिहासिक कादंबरी मात्र कन्नडमध्ये फारशी जोमदार दिसत नाही. यू. आर. अनंतमूर्ती या लेखकाने कथा व कादंबरी (संस्कार, भारतीपूर) या दोन्ही साहित्यप्रकारास महत्त्वपूर्ण योगदान दिले. गिरीश कर्नाड, चंद्रशेखर कंबार यांचाही ज्ञानपीठ पुरस्कारापर्यंत प्रवास झाला. (कन्नडमध्ये सात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक झाले. मास्ती, कुवेंपु, द. रा. बेंद्रे, गोकाक, अनंतमूर्ती, कर्नाड व कंबार).

या दरम्यान आधुनिक शिक्षणाने काहीसे परिवर्तन आणले. लेखिकांनी स्त्रीजीवन कथा-कादंबऱ्यातून चित्रित करायला सुरुवात केली. 'गांधीबंदा'सारखी पारंपरिक समाजामध्ये गांधींच्या अवतरण्यामुळे कोणते पर्यावरण निर्माण झाले ते रेखाटणारी ही कादंबरी लेखिकेकडून आली. गीता नागभूषण, त्रिवेणी, वैदेही, वीणा शांतेश्वर ते नेमिचंद्र या लेखिकांची लेखणी कन्नड साहित्यात काहीसा निराळा आयाम निर्माण करते.

१९२० पूर्वीच्या नव साहित्याच्या पहिल्या टप्प्यामध्येच कन्नड साहित्यात इंग्रजी, संस्कृत, मराठी ग्रंथांचे अनुवाद मोठ्या प्रमाणात झाले. या काळात

मराठीतील हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, गळगनाथानी कन्नडमध्ये अनुवादित केल्या. सातत्याने मराठी कथा-कादंबऱ्यांचे कन्नड अनुवाद येत असतात. आजही ती परंपरा सुरू आहे. अगदी कोसला ते 'आयदान' पर्यंत 'रीटा वेलिणकर' पर्यंतची वेचक पुस्तके कन्नडमध्ये गेलेली आहेत. उत्तर कर्नाटकाचा मराठी साहित्य-संस्कृतीशी निकटचा संबंध राहिला असल्याने आजच्याप्रमाणेच पूर्वीच्या काळीही या भाषेशी कन्नड संत व पंत कवींचा संबंध असणार. कन्नडमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या (ज्ञानेश्वरीप्रमाणे पारायण) 'कुमारभारता'वर ज्ञानेश्वरीचा प्रभाव दिसतो. आणि ज्ञानेश्वरीवर यादवकालीन कन्नड भाषेचा प्रभाव दिसतो. अल्लमप्रभू आणि रेवणसिद्ध यांची कोल्हापुरात भेट झाल्याचे संदर्भ आहेत. कनकदासाचे पंढरपूरशी घनिष्ठ संबंध होते. कनकदास आणि पुरंदरदास यांचा सहवास आहे. लोकपातळीवर कन्नड-मराठीचा सहवास होता हे सिद्ध करताना 'चामुण्डराये करवियले। गंगराजे सुत्ताले करवियले।' हे मराठीमधील पहिले व्याकरणदृष्ट्या शुद्ध वाक्यही पुरेसे आहे. वारकरी आणि वचनकार यांच्या समाजजीवनातील बंडखोरीमागेही सहसंबंध असण्याच्या शक्यता मोठ्या आहेत. त्यामुळे चक्रधरांचे 'कानडदेशा न वचावे' हे विधान वास्तविक कन्नड समाजसंस्कृतीच्या परिणामांना अधोरेखित करणारे नवे प्रकरण कन्नड वाङ्मयेतिहासात असायला हरकत नाही. अनुवादावरचे प्रकरणही असायला हरकत नाही.

कन्नडमधील प्रागतिक साहित्यावर मराठी विचार चिंतनाचा प्रभाव असल्याचे उत्तर कर्नाटकामधील विद्वान संशोधक मान्य करतात. द. रा. बेंद्रे, शिवराम कारंथ इ. प्रतिभावंतांना मराठी संवेदनविश्वाचा सहवास लाभला आहे. इतर भाषांच्या सहवासातून आपले ऐश्वर्य वाढत असते हा दृष्टिकोण निर्माण होण्याची आवश्यकता वाटते.

साहित्यिक सांस्कृतिक सहवास शोधताना शब्दांच्या वाटचाली पाहता येतील. हळगन्नड (जुने कन्नड) मधील कुंदल (केस) हा प्रयोग पुढे 'कूदल' असा झाला आहे. कुंदल हा जुना कन्नड शब्द 'वारीयाने कुंडल हाले।' या मराठी रूपात राहतो. 'गोम्मट' हा शब्द 'गोमटे' या रूपात मराठीत राहतो. पण कन्नडने हा शब्द पूर्ण सोडून दिलाय. 'सुत्ताले'- सुत्तमुत्त (सभोवताल) हा

शब्द मराठीने सोडून दिलाय.

सातवाहन काळातील तुप्प (तूप), पिट्ठ (पीठ), तीर (काठ) हे प्राकृत शब्द आजही मराठी कन्नड भाषेत वापरात आहेत. 'कविराजमार्ग'मध्ये कन्नड भाषा बारा कोसावर वेगवेगळी होते आणि तिचा आदिशेष हा दोष आहे असे नमूद आहे. परकीयांचे प्रभाव घेण्याच्या प्रवृत्तीमुळे प्रादेशिक भेदांना पुष्टी येण्याचे पर्यावरण निर्माण होण्याचे वळण या संस्कृतीत असावे, त्यामुळे कन्नड भाषा मूळातील ब्राह्मी लिपीचे मूळ (दोन्ही लिपींचे मूळ) आणि मुळातील अभीर कूळ ह्यापासून पूर्ण वेगळी होत गेली असावी.

स्त्रियांच्या संदर्भातून, वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन शक्य आहे. कन्नड भाषा संस्कृतीत अगदी बाराव्या शतकामध्येच 'स्त्री, सोने आणि जमीन' हे मायेचे घटक नव्हेत असे सांगणारे वचन आहे. त्या वचनामध्येच रूढ दृष्टी स्त्रीकडे कोणत्या दृष्टीतून पाहते हे स्पष्ट आहे. अक्कमहादेवी या कवयित्रीने आपले अत्यंत तेजस्वी अस्तित्व जगासमोर ठेवलेले होते. कंती नामक कोणी कवयित्री होती असे दंतकथा सांगतात. पण तिच्या समकालीन असणाऱ्या कवींच्या ग्रंथांमधून तिचा उल्लेखही आढळत नाही. पुढे संची होन्नम्माने लिहिले तेही केवळ त्याच रूढ जीवनधर्मावर. नवरा आणि बायको या भूमिकांपलीकडे स्त्री-पुरुषांच्या वेगळ्या भूमिका तिला विचारात घ्याव्याशा वाटू नयेत हा प्रश्न पडतो. तसेच प्राचीन काव्यग्रंथांमधून रेखाटलेल्या पौराणिक स्त्रियांना आणि कन्नड वाङ्मयाला नवी कलाटणी मिळाली हे लक्षात घ्यावे लागेल.

आज जागतिकीकरण, व्यापारीकरण, उदारीकरण या लाटेमध्ये कन्नड साहित्यावर कोणते परिणाम होताहेत, भाषिक अवकाशांमध्ये काही महत्त्वाचे बदल येताहेत त्याची वेगळी नोंद घ्यावी लागणार आहे. दलित जाणिवा, स्त्रीवादी जाणिवा, स्तर भेदाच्या जाणिवा कन्नड कथा-कादंबऱ्यांतून आज एकत्रितपणाने येऊ पाहत आहेत. ह्या नीट समजून घेण्यासाठी आकलनाचे नवे दृष्टिकोण वाङ्मयेतिहासाने प्रस्तुत करण्याची निकड येऊन ठेपली आहे.

तेव्हा काळानुरूप सातत्याने इतिहासलेखनाचे नित्यनवे प्रयोग होणे म्हणजेच त्याच्या भाषा-समाज-संस्कृतीच्या विकसनशक्तीचा तो वाटाच असतो. काळाच्या प्रवाहाबरोबर सतत नवनवे संशोधन होण्यातून नव्या

वाङ्मयनिर्मितीचा भूप्रदेश तयार होत असतो.

१९६० मध्ये वाङ्मयेतिहास आला तेव्हा केवळ आपली ओळख करून देणे हा मुख्य हेतू होता. पण आता त्याच्या पुनर्संशोधनातून आपली नेमकी ओळख शोधणे, इतर भारतीय भाषांच्या, निदान शेजारच्या भाषा अस्तित्वांचा विचार बाजूला न सारता त्यांच्याशीही संवादांच्या अधिकाधिक शक्यता निर्माण करण्याच्या दृष्टीतून प्रयत्नशील राहणे महत्त्वाचे ठरावे.

***